RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लिएही
हम जाने जाते है।
9028851719

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

संपर्क मो. 8482839451

मंगळवार १९ ऑगस्ट २०२५ | वर्ष : ५ | अंक : १५२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday 19 August 2025 | Year : 5 | Issue : 152 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्त्वाच्या बातम्या

### बेरोजगारी दरात घट

जुलै 2025 मध्ये भारताचा बेरोजगारी दर 5.2टक्के वर गेला, जो जून महिन्यातील 5.6टक्के पेक्षा कमी आहे. ग्रामीण भागात रोजगार उपलब्धता वाढली असून, तर नागरी युवकांमध्ये बेरोजगारी दर 15 ते 29 वयोगटात किंचित चढला आहे.

### INDIA ब्लॉक आणि निवडणूक आयोगाबद्दल गंभीर आरोप

INDIA (इंडिया नेशनल डेमॉक्रॅटिक अलाईन्स) ब्लॉकने आज दिल्लीमध्ये पत्रकारपरिषद घेतली. त्यांनी बिहारमधील मतदान यादीतील विशेष तपासणी आणि महाराष्ट्र व कर्नाटकमधील मतदार यादीतील संभाव्य गैरव्यवहाराबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. काँग्रेसच्या महुआ मोइत्रीने लोकसभेचा तात्काळ विघटन करण्याची मागणी केली आहे. ब्लॉकने ठाम विधान केले की आयोगाने प्रथम यादी स्वच्छ असल्याची पुष्टी केली पाहिजे, त्यानंतरच ते आयोगाच्या पुढील प्रक्रियांना भाग घेतील. याच संदर्भात, वीकांधी निवडणूक आयोगाच्या अध्यक्ष यांच्या विरुद्ध महाभियोग विचाराधीन असल्याच्या चर्चा रंगत आहेत. विरोधी पक्षनेत्यांच्या बैठकीत हे मुद्दे उपस्थित केले गेले.

### संसदेत आज भीषण घडामोडी

मॉनसून सत्राची कार्यवाही आज पुन्हा गरम होण्याची शक्यता आहे. राज्यसभा नेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या कार्यालयात विरोधी पक्षाच्या नेत्यांची बैठक आयोजित केली आहे, ज्यात पुढील संसदीय रणनीतीचा विचार होणार आहे.

### उपराष्ट्रपती निर्वाचान पूर्व NDA ला झटका

YSR कांग्रेसने NDA च्या उपराष्ट्रपती उमेदवार सी.पी. राधाकृष्णन यांच्या बाजूने मत मागितले आहे. हे समर्थन RJD च्या बाहेरून NDA साठी मोठा जोर देणारे पाऊल आहे, जे निवडणूक यशासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

### भारतात 3 वर्षांसाठी स्टीलवर आयात शूल्क

भारत सरकारने काही स्टील उत्पादनांवर तीन वर्षांसाठी सुरक्षात्मक आयात शुल्काची शिफारस केली आहे. पहिल्या वर्षी 12टक्के, नंतर तिसऱ्या वर्षी ते 11 टक्के पर्यंत कमी होईल. ही पावले चीनमधून येणाऱ्या स्टील आयातीवर निर्भर असलेल्या घरेलू उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी घेतली गेली आहेत.

### भारतीय बंदर विधेयक पारित

पार्लमेंटने 'Indian Ports Bill, 2025' पारित केला आहे. या विधेयकाद्वारे भारतातील बंदरांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी सिंगापूर आणि युरोपियन मॉडेलवर आधारित एकात्मिक नियोजन आणण्याचा उद्देश आहे.

### रूपया सुधारला : टॅक्स कपातींचा परिणाम

रुपया अमेरिकी डॉलरच्या तुलनेत अपेक्षेपेक्षा मजबूत झालेला कामा आला. कर कपातींसंबंधी प्रधानमंत्री मोदींच्या घोषणेने बाजारपेठेत सकारात्मक वातावरण निर्माण केले, ज्यामुळे विदेशी निधीचे आकर्षण वाढले.

### चीनचा परराष्ट्र मंत्री वांग यी यांची भारताला भेट

चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी द्विपक्षीय सीमारेषेबाबत चर्चा करण्यासाठी भारतात दोन दिवसांचा दौरा सुरू करीत आहेत. ही भेट महत्वाची असून, यामुळे भारत-चीन संबंधात सुधारणा होण्याचे संकेत दिसून येत आहेत.

### नागपुरासाठी खास महत्त्व : तलवार परत

नागपुरमध्ये मराठा संस्थापक रघुजी भोंसले प्रथम यांच्या तलवारीची भारतामध्ये 200 वर्षांनंतर परत येणारी ऐतिहासिक परतव आणणारी घटना आजच जुने ऐतिहासिक उत्तरदायित्व म्हणून अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

# मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग प्रस्ताव?




> भारतीय निवडणूक आयोग आपले संविधानिक कर्तव्य सोडून राजकीय पक्षांच्या खऱ्या प्रश्नांना टाळू शकत नाही. मतदानाचा अधिकार हा भारतीय संविधानाने आपल्याला दिलेला सर्वात महत्त्वाचा अधिकार आहे. लोकशाहीची गळचेपी करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाचा भारत निषेध करेल.
> – मल्लिकार्जुन खरगे

**नवी दिल्ली :** लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी मागील काही दिवसांपासून केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीवर टीका करत आहेत. मतदान प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप राहुल गांधी करत आहेत. या संदर्भात काही दिवसांपूर्वी राहुल गांधींनी एक पत्रकार परिषद घेत काही पुराव्यांचे सादरीकरण केले होते. राहुल गांधींनी केलेल्या आरोपानंतर देशभरात एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, राहुल गांधींच्या आरोपानंतर निवडणूक आयोगाने 17 ऑगस्ट रोजी पत्रकार परिषद घेत आरोपांना उत्तर देत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. तसेच राहुल गांधींच्या मत चोरीच्या आरोपांना निवडणूक आयोगाने काही नेते मतदारांची दिशाभूल करत असल्याचे म्हटलं. मात्र, निवडणूक आयोग अशा खोट्या आरोपांना घाबरत नाही. तसेच मतचोरी सारख्या चुकीच्या शब्दाचा वापर करण्यात आल्यामुळे हा भारतीय संविधानाचा अपमान असल्याचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटले. तसेच राहुल गांधी यांनी मत चोरीच्या आरोपांबाबत सात दिवसांत शपथपत्र सादर करावे किंवा देशाची माफी मागावी असा इशारा निवडणूक आयोगाने दिला.

निवडणूक आयोगाने केलेल्या या टिकेनंतर आता विरोधक चांगलेच आक्रमक झाल्याचे बोलले जात आहे. कारण इंडिया आघाडीचे नेते मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात महाभियोगाचा प्रस्ताव मांडण्याच्या विचारात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यसभेतील खासदार आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या बैठकीत या विषयावर चर्चा झाल्याचे बोलले जात आहे.

तसेच विरोधी पक्ष नेत्यांच्या पत्रकार परिषदेत राजदचे नेते मनोज कुमार झा यांनी म्हटले की, 'आमच्यासमोर सर्व संसदीय आणि कायदेशीर पर्याय खुले आहेत.' दरम्यान, महाभियोगाच्या सूचनेची शक्यतेनंतर भाजपाकडून तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. सत्ताधारी पक्षाने विरोधी पक्षाच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. दरम्यान, या घडामोडींवरून आता सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकारण तापण्याची शक्यता आहे.

## ज्येष्ठ समाजसेवक अमिताभ पावडे यांचे अपघाती निधन



**नागपूर** ज्येष्ठ समाजसेवक, विचारक, कृषी अभ्यासक, कृषीतज्ञ, एअरपोर्ट अथोरिटी ऑफ इंडियाचे माजी एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर , विविध सामाजिलक संस्थांशी त्यांचा संबंध होता. तसेच अहमदाबाद विमानतळाच्या निर्मितीमध्ये त्यांचे महत्वाचे योगदान होते. इंजिनिअर अमिताभ पावडे यांचे दि. 18 ऑगस्ट रोजी मंगळवारी सायंकाळच्या सुमारास अपघातात निधन झाले. ते 62 वर्षाचे होते. उदया दिनांक 19 रोजी सकाळी 11 वाजता त्यांच्या राहत्या घरून माक्षधाम येथे अंत्ययात्रा निघेल.

आज सायंकाळी त्यांच्या घराजवळ दोन चाकी गाडी भरधाव वेगाने जात असताना अचानक थडक दिली. लगेच त्यांना न्युरॉन हॉस्पिटल मध्ये ॲडमिट केले होते व तिथेच मृत्यू झाला. त्यांची बॉडी मेडिकल कॉलेजला पोस्टमार्टसाठी नेण्यात आली आहे. आता जीएमसीमध्ये मृत धोषित करण्यात आले. दैनिक बहुजन सौरभच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली!

## कंपनीला सुमारे 3000 बिघा जमीन देण्यावर न्यायालयाचा आक्षेप

**आसाम :** गुवाहाटी उच्च न्यायालयाने आसाममधील दिमा हासाओ परिसर खाणकामासाठी एका खाजगी सिमेंट कंपनीला देण्यावर प्रश्न उपस्थित केला आहे. महाबल सिमेंट्स नावाच्या कंपनीला सुमारे 3000 बिघा जमीन देण्यावर न्यायालयाने आक्षेप व्यक्त केला आहे. जमीन वाटपावरून सरकारला फटकारताना न्यायालयाने म्हटले आहे की 3000 बिघा म्हणजेच संपूर्ण जिल्हा एका खाजगी कंपनीला देण्यात आला होता. ही थट्टा आहे का?



या खटल्याची सुनावणी करतांना न्यायमूर्ती संजय कुमार मेधी म्हणाले, '3000 बिघा! म्हणजे संपूर्ण जिल्हा? काय चाललंय? 3000 बिघा एका खाजगी कंपनीला देण्यात आली आहे? आम्हाला माहिती आहे की जमीन किती नापीक आहे...3000 बिघा? हा कोणत्या प्रकारचा निर्णय आहे? हा विनोद आहे की आणखी काही? तुमची गरज हा मुद्दा नाही...जनहित हा मुद्दा आहे.'

न्यायालयाने पुढे म्हटले की, हा जिल्हा भारतीय संविधानानुसार सहावा अनुसूचित जिल्हा आहे. अशा परिस्थितीत, तेथे राहणाऱ्या आदिवासींच्या हक्कांना आणि हितांना प्राधान्य दिले पाहिजे.

## पाटण्यात एसटीईटी उमेदवारांवर लाठीचार्ज

### परीक्षा नाही, मतदान नाही अशा घोषणा देत गर्दी बाहेर



**पटना :** बिहार लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या शिक्षक भरती परीक्षेपूर्वी पात्रता चाचणी घेण्याची मागणी करत शेकडो उमेदवार सोमवारी पाटण्याच्या रस्त्यावर उतरले. उमेदवारांनी पाटणा कॉलेजपासून पायी मोर्चा सुरू केला आणि मुख्यमंत्र्याच्या निवासस्थानापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी उमेदवारांना डाकबंगला क्रॉसिंगवर थांबवले आणि बॅरिकेडिंग केले. अधिकाऱ्यांनी निदर्शकांना समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु उमेदवार त्यांच्या मागणीवर ठाम राहिले आणि त्यांनी सरकारविरुद्ध घोषणाबाजी सुरू केली. सरकार शिक्षक पात्रता चाचणी घेईपर्यंत त्यांचे आंदोलन सुरूच राहील, असे उमेदवारांनी सांगितले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी लाठीमार केला. यामध्ये एक उमेदवार बेशुद्ध पडला, तर काही विद्यार्थी नेत्यांना ताब्यात घेण्यात आले.

## एमबीबीएस प्रवेशात आरक्षणाची निम्मी कपात, 766 विद्यार्थ्यांचे नुकसान!



**नागपूर :** महाराष्ट्रातील सुरू असलेल्या एमबीबीएस प्रवेश प्रक्रियेवरून गंभीर वाद निर्माण झाला आहे. खासगी आणि विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये घटनात्मक आरक्षण निम्म्याने कमी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल स्टुडंट्स फेडरेशनने दावा केला आहे की, अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), विमुक्त जाती (व्हीजे), भटक्या जमाती (एनटी) आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) यांचा कोटा बेकायदेशीरपणे 50 टक्क्यांवरून केवळ 25 टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला, ज्यामुळे शेकडो विद्यार्थी त्यांच्या हक्काच्या जागा गमावण्याच्या मार्गावर आहेत. फेडरेशनच्या म्हणण्यानुसार, राज्याच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषध विभागाच्या या मनमानी निर्णयामुळे 766 आरक्षित वर्गातील इच्छुकांना यावर्षी खासगी महाविद्यालयांमध्ये एमबीबीएस अभ्यासक्रमात प्रवेश नाकारण्यात आला. तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी करत एससी/एसटी आयोगाकडे आधीच निवेदन सादर करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात 23 खासगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये आहेत ज्यांमध्ये एकूण 3,219 एमबीबीएस जागा आहेत. घटनात्मक तरतुदींनुसार, मागासवर्गीय समुदायांसाठी 1,533 जागा राखीव असायला हव्या होत्या. पण धक्कादायक बाब म्हणजे, केवळ 767 जागा वाटप करण्यात आल्या आहेत, असा आरोप फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. सिद्धांत भरणे यांनी केला आहे.

## राजा गार्डनमधील इलेक्ट्रॉनिक्स इमारतीला भीषण आग

### दोन मुलींसह तीन जणांचा मृत्यू; एकाची प्रकृती गंभीर

**नवी दिल्ली :** पश्चिम दिल्लीतील राजा गार्डन परिसरातील महाजन इलेक्ट्रॉनिक्स इमारतीत सोमवारी दुपारी 3¬08 वाजता भीषण आग लागल्याने दोन महिलांसह तीन जणांचा मृत्यू झाला तर एकाची प्रकृती गंभीर आहे. ही इमारत तीन मजली असून त्यात तळघर आहे आणि ही घटना तिसऱ्या मजल्यावरील एका कार्यालयात घडली, जिथे बळी पडलेले लोक स्वतःला अडकून पडले.

दिल्ली अग्निशमन दलाच्या पथकाने तात्काळ कारवाई करत आग आटोक्यात आणली आणि चारही जणांना कार्यालयातून बाहेर काढून रुग्णालयात नेले. दुर्दैवाने, उपचारादरम्यान तीन जणांचा मृत्यू झाला, तर एकाची प्रकृती अजूनही गंभीर आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. घटनेचे कारण



शोधण्यासाठी तपास सुरू आहे.

पोलिसांनी सांगितले की, मृत मुलींपैकी एका मुलीचे नाव आयुषी, वय 23 वर्ष आणि दुसऱ्या मुलीचे नाव अमनदीप कौर, वय 21 वर्ष असे आहे. उर्वरित मुलाचे नाव रवी असल्याचे सांगितले जात आहे.

## जयभीम जनक बाबू हरदास यांच्यासारखे कणखर पुढारी पाहिजे : पुस्तक प्रकाशन सोहळ्यात वक्त्यांचा सूर

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी म्हणून बाबू हरदास यांनी कणखर भूमिका घेतली. त्यातून नवचैतन्य निर्माण झाले. या नवचैतन्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ ही सर्वत्र पसरली असे अध्यक्षीय भाषणात भदंत नागदीपंकर यांनी सांगितले तर, जयभीमचा नारा देऊन नागपूर कामठीचे नाव जगाच्या पाठीवर घेऊन गेले. आज त्यांचे छायाचित्र प्रत्येक बौद्ध विहारात लागावे अशी माझी मनोमन भूमिका आहे असे उद्योजक शैलेंद्र नगरारे यांनी सांगितले. लोकप्रिय बाबू यांचे वंशज म्हणून आम्ही आहोत. परंतु डॉ. बाबासाहेब यांचे वंशज हा सारा समाजच आहे. माझे आजोबा हरदास यांनी डॉ. बाबासाहेबांसोबत कार्य केले. त्या ध्येयातून आज समाज आपल्या पायावर उभा आहे. असे प्रशांत नगरकर यांनी सांगितले. आंबेडकरी चळवळीचा प्रचार आणि प्रसार हा चरित्रात्मक पुस्तकाची प्रेरणा आहे, प्रा. भीमराव गायकवाड यांचे प्रकाशित झाले असे विलास गजभिये म्हणाले तर प्रा. भीमराव गायकवाड यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले की बाबांचा परिचय व्हावा आणि तो इतरांना प्रेरणादायी ठरावा ही माझी पुस्तक लिहिण्यामागची भूमिका आहे.



या प्रसंगी जयभीम जनक बाबू हरदास पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सोबत डॉ. आशिष थूल यांच्या जयभीम जनक हरदास दुसऱ्या आवर्तीचे प्रकाशन करण्यात आले.

परिवर्तन विचार मंच कडून प्रा. भीमराव गायकवाड यांचे जयभीम जनक बाबू हरदास यांचे चरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशन समारंभ सोहळा विदर्भ हिंदी साहित्य संमेलन सीताबर्डी, नागपूर, आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भदंत नागदीपंकर महास्थवीर, प्रमुख अतिथी प्रशांत नगरकर [बाबू हरदास एल.एन यांचे वंशज], कार्यकारी संपादक विलास गजभिये, उद्योजक शैलेंद्र नगराळे, पुस्तकाचे लेखक प्रा. भीमराव गायकवाड, सुजाता गायकवाड उपस्थित होते. विविध संस्था संथगार फाउंडेशन संस्था, संविधान जागर संघ-नागपूर अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर.

रमाई महिला मंडळ, टेकअप सिटी नागपूर, महिला धम्म प्रशिक्षण वर्ग, पिंपलाफाटा, नागपूर, उत्कर्ष बहुद्देशीय संस्था पारधीनगर, हिंगणा, सुगतनगर महिला सामाजिक बहुउद्देशीय संस्था, नागपूर, खुशबू कल्चरल आर्ट ॲकेडमी, नागपूर, समता सैनिक दल आदीचा सत्कार करण्यात आला. संचालन डॉ. सुनंदा जुलमे, आभार रजनी फुलझेले यांनी केले. राम घोडेस्वार, डॉ. अशोकानंद देशभ्रतार, मालती वराडे, प्रभू फुलझेले, रंजना लोखंडे, विनोद आटे, डी.आर. कांबळे, मनोहर गजभिये, डॉ. दिनेश कोंटागळे, डॉ. माधव जांभुळे, जया कलाकारी, प्रा. डॉ. मनीष वानखेडे, नरेश मेश्राम, रामजी माटे, दिवाकर शिर्के, अखिलेश गायकवाड, डॉ. प्रज्वल गायकवाड, सुजाता गायकवाड, सोनल गायकवाड, रंजना गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, आदेश गायकवाड, सोनाली गायकवाड, माई गायकवाड, लल्या गायकवाड, राजेश तामगाडगे आदी उपस्थित होते.



शुभेच्छुक
आई अंकिता, बाबा सुमित, नाना प्रकाश शामकुवर, नानी डॉ. सरोज डांगे शामकुवर, मामा अनुराग शामकुवार, आज्जी नीता रामटेके, आजोबा विजय रामटेके, आशनी, श्वेता आणि आशिष कोल्हे

Master Gautam Alias Bodhi Ashish Nandagaoli...
Blessing from :--
Bipin Gajbhiye& Pradhnya Gajbhiye and Yashpal&Nutan Ku.Rajvi Ashish Nandagaoli, Ayu.Shouransh Milind, Ayu. Milind B Gajbhiye&Ayu Swati Milind Gajbhiye,Ayu. Rigyaansh Rudraansh. Bela, Bhandara & Ayu. Ashish Mahendra Nandagaoli(Father) Ayu.- Harshyogini


Ashish Nandagaoli(Mother),Ayu.- Mahendra Nandagaoli(Grand father) Ayu.Hemlata Mahendra andagaoli.(Grand mother) BhilgaonNagpur.

“ दिवा मातीचा आहे की सोन्याचा हे महत्वाचे नसून, तो अंधारात प्रकाश किती देतो हे महत्वाचे आहे. ”



बहुजन सौरभ

## संपादकीय

# जनता विरुद्ध हुकूमशाही

भारतीय लोकशाहीच्या मूलभूत संस्थेवर म्हणजेच निवडणूक आयोगावर आज सगळ्यात मोठे संशयाचे सावट आहे. कारण तो आता संविधानाचा प्रहरी न राहता, नरेंद्र मोदी, अमित शहा आणि अडाणी यांच्या राजकीय-आर्थिक साटेलोटयाचा नोकर बनला आहे. राहुल गांधींविरुद्ध चालवलेली 'कारवाई' ही त्याच कटाची साक्ष आहे. राहुल गांधी हे सध्या मोदी सरकारसमोरचे एकमेव भीतीदायक राजकीय चेहरा झाले आहेत. त्यांनी 'अडाणी-हिंडनबर्ग' घोटाळा उघड केला, ज्यात अडाणींचा शेअर बाजारातील फसवणूक, सार्वजनिक बँकांचे कर्ज, जनतेच्या पैशांची लूट उघड झाली. मोदींचे अडाणीप्रेम हे आता संपूर्ण देशाला समजले आहे. त्यामुळे मोदींनी आयोगावर दबाव आणून राहुल गांधींच्या प्रत्येक भाषणावर कारवाई सुरू केली. अमित शहा निवडणूक प्रचारात काहीही बोलतात - कधी मुस्लिमांविरुद्ध द्वेष, कधी विरोधकांना 'देशद्रोही' म्हणणे, कधी सरळ सरळ धमक्या देणे... पण निवडणूक आयोग गप्प बसतो. राहुल गांधी मात्र अडाणींचे नाव घेताच, आयोग नोटीस टाकतो. याला म्हणतात दुहेरी न्याय - एक भाजपसाठी मोकळे रान, दुसरे विरोधकांसाठी तुरुंग! राहुल गांधींनी जेव्हा 'मोदी म्हणजे अडाणीचा एजेंट' अशी थेट भाषा वापरली, तेव्हा आयोगाने तत्काळ हालचाली केल्या. अडाणींवर टीका करणे हे आयोगाला गुन्हा वाटते, पण अडाणींनी देशाची संपत्ती लुटणे हा गुन्हा नाही का? आयोग हा अडाणींच्या संपत्तीचा रक्षक झाला आहे, संविधानाचा नाही. 2019 मध्ये 'मोदी की सेना' म्हणणाऱ्या भाजप नेत्यांवर काहीच कारवाई नाही. धार्मिक ध्रुवीकरण करणाऱ्या प्रचारांवर कोणतीही नोटीस नाही. पण राहुल गांधींनी 'मोदी-अडाणी गाठ' दाखवली की आयोगाची तलवार नाचते. यातून स्पष्ट आहे की आयोग हा मोदी - शहा-अडाणींच्या रिमोटवर चालतो. राहुल गांधींना संसदेतून निलंबित केले, कोर्टात खेचले, आता आयोगाचा वापर करून गप्प बसवायचा प्रयत्न सुरू आहे. पण राहुल गांधींनी 'भारत जोडो यात्रा'तून जे बोलणे सुरू केले ते आता जनतेच्या तोंडातून बोलले जाते आहे. शेतकरी, बेरोजगार तरुण, आदिवासी, दलित - हे सगळे आज राहुल गांधींच्या प्रश्नांशी जोडले गेले आहेत. 'निवडणूक आयोग विरुद्ध राहुल गांधी' ही लढाई फक्त एका नेत्याची नाही, तर जनतेच्या हक्काची आणि लोकशाहीच्या अस्तित्वाची लढाई आहे. मोदी - शहा-अडाणी तिघांचा कट म्हणजे - शक्तीचा वापर करून विरोधक गप्प करणे जनतेचा पैसा कॉर्पोरेटच्या खिशात घालणे राहुल गांधींचा आवाज दाबण्याचा प्रत्येक प्रयत्न म्हणजे लोकशाहीवर हल्ला आहे. आणि आता जनतेलाच ठरवायचे आहे- आपण गुलामशाही स्वीकारायची की लोकशाही वाचवायची?' भारतीय लोकशाहीच्या इतिहासात निवडणूक आयोगाला सदैव निष्पक्ष प्रहरी मानले गेले. पण आज परिस्थिती पूर्णतः उलटी झाली आहे. आयोग हा आता मोदी-शहा यांच्या राजकारणाचा आणि अडाणींच्या पैशांचा दरबारी नोकर झाला आहे. राहुल गांधींवर कारवाई हे त्याचे ठळक उदाहरण. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदींनी थेट 'पाकिस्तानला धडा शिकवणारे सैनिक हे माझे सैनिक आहेत' असे म्हटले. हे सरळ सरळ सेना राजकारणासाठी वापरणे होते, जे संविधानाच्या नियमांना विरोधात आहे. आयोग मात्र गप्प राहिला. त्याच वेळी, राहुल गांधींनी 'चौकीदार चोर आहे' असे म्हणताच तात्काळ नोटीस बजावली गेली. हा फरक जनतेने विसरलेला नाही. मुस्लिमांविरुद्ध सरळ द्वेषपूर्ण भाषणे केली. 'पहिल्या मतदानानंतर ईद, दुसऱ्यानंतर रामराज्य' अशा जाहिराती केल्या. काही नेत्यांनी तर 'देशद्रोह्यांना गोळी मारा' अशी घोषणा केली. पण आयोगाने कोणतीही कारवाई केली नाही. त्याच वेळी राहुल गांधींनी 'मोदी-अडाणी गाठ' उघड केली आणि तात्काळ नोटीस बजावली गेली. म्हणजे आयोगाला द्वेष मान्य, पण भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज गुन्हा आहे. अमित शहा हे भाजपचे 'चाणक्य' नाहीत; ते निवडणूक आयोगाचे 'रिमोट कंट्रोल मास्टर' झाले आहेत. राहुल गांधींच्या प्रत्येक सभेवर आयोगाचे पोलीस, प्रत्येक भाषणावर नोटीस, आणि मोदी-शहा यांच्या सभांवर मात्र पूर्ण मोकळीक. हा आयोग आता भाजपचा निवडणूक व्यवस्थापक आहे, जनतेचा नाही. राहुल गांधींनी अडाणी घोटाळा उघड केला. LIC, SBI सारख्या संस्थांचे हजारो कोटी अडाणींच्या खिशात कसे गेले, हे त्यांनी सांगितले. पण आयोगाला ते सहन झाले नाही. कारण अडाणींच्या पैशावरच भाजपचा प्रचार उभा आहे प्रायव्हेट जेट्स, हजारो कोटींची जाहिराती, सोशल मीडियावरचा फेक प्रचार. ही सगळी व्यवस्था अडाणींच्या पैशावर, आणि आयोगाची गप्पी त्याच पैशाच्या भीतीवर! राहुल गांधींना संसदेतून बाहेर काढले, न्यायालयात खेचले, आता आयोगाचा वापर करून थांबवायचे ठरते आहे. पण त्यांची 'भारत जोडो यात्रा', 'न्याय यात्रा' यांनी गरीब, शेतकरी, बेरोजगार, आदिवासी, दलित यांचा आवाज उचलला आहे. त्यामुळे हे आता फक्त राहुल विरुद्ध आयोग राहिलेले नाही; ही आहे जनता विरुद्ध हुकूमशाही. 'निवडणूक आयोग विरुद्ध राहुल गांधी' हा संघर्ष म्हणजे - जनतेच्या हक्काविरुद्ध सत्ताधाऱ्यांचा कट, संविधानाविरुद्ध कॉर्पोरेट साम्राज्य, आणि लोकशाही विरुद्ध गुलामशाही. मोदी-शहा-अडाणींचे हे त्रिकोणी साम्राज्य लोकशाहीला विकायला निघाले आहे. आयोगाने जर आपली भूमिका बदलली नाही, तर तो भविष्यात इतिहासात 'लोकशाहीचा खून करणारा आयोग' म्हणून ओळखला जाईल. आता जनता ठरवणार आहे - आपण अजूनही मोदी-शहा-अडाणींच्या गुलामशाहीत जगायचे का? की संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी आवाज उठवायचा? भारतीय लोकशाहीच्या चौकटीत एक नवी खडाजंगी रंगते आहे - 'निवडणूक आयोग विरुद्ध राहुल गांधी'. निवडणूक आयोग हा संस्थात्मक लोकशाहीचा संरक्षक मानला जातो. परंतु गेल्या काही काळात तो सत्ताधाऱ्यांच्या तालावर नाचतो आहे, हे वारंवार दिसून येत आहे. आता राहुल गांधींना लक्ष्य करून आयोगाने घेतलेल्या पावलांमुळे केवळ सत्तेचे गुलामगिरीत रूपांतर झालेले दिसते निवडणूक आयोग हा स्वतंत्र, निष्पक्ष, संवैधानिक संस्था म्हणून ओळखला जातो. पण आज त्याची वर्तणूक पाहिली, तर तो सत्ताधाऱ्यांच्या दबावाखालील 'सेवक' वाटतो. राहुल गांधींच्या भाषणांवर, त्यांच्या प्रचार पद्धतीवर कारवाई करण्यासाठी आयोगाने जी गडबड केली आहे, त्यात 'जनतेचा आवाज दाबण्याचा कट' स्पष्ट दिसतो. राहुल गांधी हे सध्या मोदी सरकारच्या विरोधातील प्रमुख आवाज झाले आहेत. 'अडाणी-भ्रष्टाचार', 'संपत्ती-लूट', 'शेतकऱ्यांचा विश्वासघात' यावर ते सतत बोलतात. त्यामुळे सत्ताधारी अस्वस्थ आहेत. आणि आयोगाला दबावाखाली वापरून राहुल गांधींना रोखण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रश्न असा आहे की आयोग निवडणूक नियंत्रण करत आहे की विरोधकांचा गळा घोटत आहे? सत्ताधाऱ्यांचे मंत्री जेव्हा धार्मिक द्वेष पसरवतात, तेव्हा आयोग मौन धारण करतो. पण राहुल गांधी एखाद्या उद्योगपतीवर किंवा सरकारवर प्रश्न उपस्थित करतात, तेव्हा त्यांच्यावर नोटिसांचा मारा होतो. ही दुहेरी भूमिका म्हणजे संविधानाशी द्रोह आहे. आज निवडणूक आयोगाने आपली विश्वासार्हता गमावली आहे. जनतेच्या मनात प्रश्न उभा राहतो - निवडणुका आयोग लढवतो की जनता? जर विरोधकांचा आवाज सतत गप्प केला जाणार असेल, तर हा निवडणूक आयोग लोकशाहीचा प्रहरी राहिला नाही, तर हुकूमशाहीचा चाकर झाला आहे. राहुल गांधींवर कितीही हल्ले झाले तरी ते मागे हटलेले नाहीत. त्यांनी आपल्या प्रचारात 'भारत जोडो'ची भाषा, 'शेतकऱ्यांचा संघर्ष' आणि 'रोजगाराचा हक्क' यांची गूंज दिली आहे. त्यामुळे ही लढाई केवळ राहुल विरुद्ध आयोग नाही; ही जनतेच्या आवाजाची सत्तेच्या दबावाविरुद्धची लढाई आहे. आयोगाला संविधानाचा रक्षक बनवायचे की सत्ताधाऱ्यांचा वफादार नोकर बनू द्यायचे. तुम्हाला हवे आहे का मी हा लेख आणखी अधिक आक्रमक, नावानिशी (मोदी, शाह, अडाणी, निवडणूक आयुक्त) करून द्यावा? ■ ■

# संघाची तारीफ मनुस्मृतीची रुजवण

**भारतीय स्वातंत्र्याच्या 79 व्या स्वातंत्र्य दिनी प्रधानमंत्र्याने लाल किल्ल्यावरुन गरळ ओकली. त्यामुळे देशात चर्चेला उधाण आले आहे. 'आज मी अभिमानाने सांगू इच्छितो की, शंभर वर्षांपूर्वी आर एस एस जन्माला आली. ही एक एन. जी. ओ. आहे. तिचे सेवा, समर्पन, शिस्त, संघटना उल्लेखनीय आहे. तिची राष्ट्रसेवा गौरवशाली आहे. तिने माँ भारतीच्या कल्याणासाठी जीवन समर्पित केले आहे,' वगैरे. यामुळे देशात अनेक प्रश्नांसह, विविध शंका, कुशंकांना उधाण आले आहे आणि संविधानिक देशाच्या विश्वासार्हतेत एक अविश्वास आणि संभ्रम निर्माण झाला आहे.**

खरेच आरएसएस एवढी पवित्र आहे? की अपवित्र? खरेच आरएसएस एवढी अहिंसक आहे? की हिंसक? खरेच देश हितोपयोगी आहे? की देशविनाशक? खरेच संविधान पुरक आहे? की मनुस्मृतीपुरक? खरेच मानवतावादी आहे? की, विषमतावादी? खरेच सर्वधर्मसमभाववादी आहे? की ब्राह्मणी वर्चस्वभाववादी? खरेच लोकशाही मानणारी आहे? की हूकूमशाही? खरेच राष्ट्रीय तिरंगा ध्वज मानणारी आहे? की भगवा ध्वज? राष्ट्रीय गीत मानणारी आहे? की वंदे मातरम्? हिंदूवर्चस्व मानणारी आहे की संघी ब्राह्मणीवर्चस्व? असे विचारमंथन सध्या देशात पुन्हा एकदा सुरू झाले आहे आणि हे एका अर्थाने बरे ही झाले की, पुन्हा एकदा संघाचा चेहरा तरूणाईला बघायला मिळेल तो रक्तरंजित आहे की मानवीय आहे? प्रधानमंत्र्याचे विचार आणि संघाची कृती ही देशहितार्थ आहे की देशविघातक? हे पण कळेल. आरएसएस चे गौरविण्यायोग्य रूप तमाम भारतवासियांना शंभर वर्षात का बरे दिसले नाही? ते फक्त प्रधानमंत्र्यालाच कसे दिसले? आणि आताच कसे दिसले? या आधी का दिसले नाही? की प्रधानमंत्री खोटे बोलत आहेत? यावर देशात वैचारिक उथलपुथल सुरू आहे. हे काय औचित्य झाले? सण कुठला, वार कुठला, दिवस कोणता? या दिवसाचे महत्व काय? शहिदांचा मान पान सन्मान? की ज्यांचे काहीच योगदान नाही त्यांचे गुणगान? आणि ते ही प्रधानमंत्री बोलतात? आणि कुठे बोलतात? याचे काही तरी भान असावे? सगळेच कसे बेमालूम! कशाचा कशाशी मेळ नाही. किमान देशाच्या अतिहुशार प्रधानमंत्र्यांकडून तरी भारतीयांना अशा भाषणाची अपेक्षाच नव्हती. कारण इतिहासाच्या पानांवर असे नमूद आहे की, राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या हत्येनंतर तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी आरएसएस वर बंदी लादली होती. पुढे आणीबाणीत सुद्धा बंदी लादली होती ई. मग अशा या बंदी लादलेल्या घातक संघटनेची, एनजीओची राष्ट्रसेवा गौरवशाली ती कोणती? गौरविलेली मानवसेवा ती कोणती? स्वातंत्र्यदिनी अशा संघटनेचा गौरवशाली उल्लेख करणे म्हणजे हा तर स्वातंत्र्यदिनाचा अपमान आहे.

हा तर राष्ट्राचा अपमान आहे. तिरंगा ध्वजाचा अवमान आहे. स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या तमाम शहिद वीरांचा अपमान आहे. स्वातंत्र्य लढ्यात सहभागी शेकडो, हजारो, लाखो हालअपेष्टा सोसणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांचा हा अवमान आहे. कारण ही संघटना, एनजीओ बेकायदेशीर आहे. ही संघटना, एनजीओ संविधानिक नाही. आरएसएस प्रमुख म्हणतात की, राम मंदिर प्राण प्रतिष्ठेच्या दिवशी देशाला खरे स्वातंत्र्य मिळाले. ते देशासोबत खोटे बोलतात. तर यांचे अंधभक्त 2014 साली देशाला स्वातंत्र्य मिळाले म्हणतात. ते पण देशासोबत खोटेच बोलतात. जुन्या आखाड्याचे महामंडलेश्वर यति नरसिंहानंद म्हणतात की, तिरंग्याचा बहिष्कार करा, याने हिंदूंना बरबाद केले. आम्ही भगवा ध्वज मानू. यातून यांचे भारत देशाप्रतीचे संघी प्रेम दिसून येते. तर काही शास्त्री - बुवा म्हणतात की, हमें संविधान बदलना है अशा संघीमुशीत तयार झालेली व्यक्ती, संस्था, संघटना, एनजीओ देशगौरवास पात्र कसे? असे अनेक उदाहरणे देता येतील, जे आरएसएस च्या मनुवादी, विषमतावादी वैचारिक मुशीचा आणि देशासाठी द्वेषमूलक आणि हिंसक कारवायांच्या शिकवणूकीचा परिपाक आहेत. आरएसएस चा राष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्यात काय सहभाग होता? हे सर्वांना माहित आहे. तसेच स्वातंत्र्यानंतरही देशाच्या सर्वांगीण जडणघडणीत या संघटनेचा काय सहभाग राहिला आहे? हे सुद्धा देशातील नागरिक स्वातंत्र्यापूर्वी ही आणि स्वातंत्र्यानंतरही उघड्या डोळ्यांनी बघत आहेत. आरएसएस ने कधी भारतीय संविधान मानले नाही. त्याच्यात नमूद मूलभूत हक्क, आधिकार, कर्तव्य ई. मूल्यांची देशात अंमलबजावणी करण्यासाठी कधी केंद्र किंवा राज्य सरकारकडे लेखी निवेदने देऊन मागणी केली नाही. स्वतःहून सामाजिक सौहार्दाचे, सर्वधर्मसमभावाची, बंधुभावाची, सामाजिक न्यायाची वर्तणूक ठेवली नाही. त्यांनी भारतीय तिरंगा ध्वज कधी मानला नाही. राष्ट्रीय चिन्हाला कधी जुमानले नाही. देशाच्या महापुरूषांबद्दल आणि शहिदांबद्दल अनेकदा अपशब्द वापरून त्यांचा अवमानच केलेला आहे. काळी टोपी डोक्यावर चढवून या देशाचा कायम निषेधच करीत आले आहेत. गाव तिथे संघ शाखा उघडून केवळ ब्राह्मणी वर्चस्वासह इतर धर्मियांचा द्वेषच करीत आले आहेत. हातात लाठी काठी घेतली ती कोणासाठी? तर वर्णाधिष्ठीत उच निच भेदभाव करून हिंदूंनी हिंदूचेच टाळके झोडण्यासाठी. जगात कुख्यात, रानटी, हिंस्र क्रूरकर्मा हिटलरचे चिन्ह यांचे आदर्शवत कसे? आरएसएस चे नेते जर्मनीत कशासाठी गेले होते? इटलीला जाऊन क्रूरकर्मा नेपोलियनला कशासाठी भेटले होते? नेपोलियन, हिटलरला भेटणे हे संघाचे कशाचे द्योतक आहे? दरवर्षी हे अतिशय जिवघेण्या बेकायदेशीर घातक शस्त्रांचे पूजन करतात ते का? आणखी दाभोळकर, पानसरे, कलबूर्गी, गौरी लंकेश टिपण्यासाठी की कोण्या दुसऱ्या राष्ट्राचा बदला घेण्यासाठी? हे मुद्दे सुद्धा भाषणात यायला हवे होते. असे भारतीय नागरिक बोलत आहेत. काय यांनी कधी एक गाव एक स्मशानभूमीसाठी संघर्ष केला आहे? गाव तिथे




शाळा, आरोग्य केंद्राची मागणी केली? काय यांनी कधी हिंदूंना शिक्षणात, नोकऱ्यात आरक्षण मिळावे म्हणून संघर्ष केला? काय यांनी कधी 'संघशाखा तिथे जातीनिर्मूलन' असा प्रयत्न केला आहे? काय यांनी 'संघ शाखा तिथे एक पाणवठा' अशी समानता जोपासली आहे? काय यांनी संघ शाखा तिथे गावातील जातवार घरांची ठेवण, गल्ल्या, वस्त्यांची रचना वास्तव बदलण्यासाठी पुरोगामीत्वाचे धोरण अवलंबीले आहे? काय यांनी कधी धर्मांधता, कर्मकांड, थोतांड, अंधश्रद्धा यापासून देशाला सावध करून विवेकी, विज्ञाननिष्ठ बनवण्याचा संकल्प प्रयत्न केला आहे? काय यांनी देशात एकता, भाईचारा वाढविण्यावर भर दिला? यांनी कधी हिंदूंना सर्वसमावेशक सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायाची मागणी केली? मग यांची राष्ट्रसेवा ती कोणती? मग ती गौरविण्यायोग्य कशी? यावर प्रधानमंत्र्यांनी बोलायला हवे होते. 'घूसपेठी देशातील तरुणांची रोजी रोटी छिनून घेत आहेत', असे प्रधानमंत्र्यांचे वक्तव्य हे कशाचे द्योतक आहे? स्वतःच्या नाकामीपणाचे? स्वतःच्या अकार्यक्षमतेचे? की आणखी कशाचे? हे घुसपेठी कोण आहेत? हे पण देशाला सांगायला पाहीजे होते. मग तुम्ही दहा वर्षांपासून काय करता? देशातील मंदिरे कोणाच्या ताब्यात आहेत? त्यातील शेकडो हजारो, लाखो रू. रोकड, सोने, चांदी कोणाच्या ताब्यात आहेत? घूसपेठींच्या? पुरोहितांच्या? ब्राह्मण्यवाद्यांच्या? की देशातील तरूणांच्या? मग देशातील तरुणांची रोजी रोटी कोण छिनून घेत आहेत? देशातील केंद्र आणि राज्य सरकारी सर्व प्रमुख, महत्वाच्या उच्चपदस्थ सरकारी नोकऱ्या कोणाच्या ताब्यात आहेत? घूसपेठींच्या? ब्राह्मण्यवाद्यांच्या? की देशातील तरूणांच्या? मग तरूणांची रोजी रोटी कोण छिनून घेत आहे? कोणते घूसपेठी छिनून घेत आहेत? देशातील उद्योगधंदे कोणाचे आहेत? बेरोजगार तरूणांचे? की अदानी अंबानीचे? हे पण देशाला सांगीतले असते, तर बरेच झाले असते. सरकारी नोकरभरती बंद करून, तरूणांना देशोधडीला लाऊन त्यांना दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या देण्याची थाप कोणी मारली? पंधरा पंधरा लाख भारतीयांच्या खात्यात जमा करण्याचे खोटे कोण बोलले? असे बोलणारे कोणत्या संघटनेत, एनजीओ मधे राहून असे खोटे बोलण्यात एवढे पटाईत झाले? हे पण त्यांनी देशाला सांगायला पाहिजे. देशाला कळाले तरी असते की, घुसपेठी कोण आहेत? आरएसएसचे गुणगान म्हणजे देशात सुरू असलेल्या मनुस्मृतीपुरक अमानवीय विचार, कृती आणि विषमतेची पाठराखण करणे होय आणि त्याच्या कृत्यांना बढावा देणे होय. धर्मांध हिंसा, धर्मांध द्वेष याचे गुणगान गाणे होय. आरएसएस चे गुणगान म्हणजे दलित, मुस्लिम आदिवासी, ख्रिश्चनांवरील वैयक्तिक आणि सामुहिक विनाशाचे समर्थन होय. आरएसएस चे गुणगान म्हणजे त्याच्या मातृ - पितृ संघटना व्हिएचपी, बजरंग दल, अभिनव भारत ई. झूंडींच्या असंविधानिक, बेकायदेशीर कृत्यांना बळकटी प्राप्त करून देणे होय. म्हणून सुदर्शन चक्र राबवायचेच असेल तर ते फक्त रेल्वे, हॉटेल, हॉस्पीटल, धार्मिक स्थळे ई. ठिकाणच्या सुरक्षेसाठी मर्यादित न ठेवता, हे सुदर्शन चक्र त्यांच्यावर ही चालवा, जे भारतीय संविधानाचा अवमान करतील, हे सुदर्शन चक्र त्यांच्यावर ही चालवा, जे जातीवाद करतील. त्याला बढावा देतील, जे धर्मद्वेष पसरवतील, जे देशातील एकता, एकात्मता, बंधुभाव बिघडवतील. जे लोकशाही मोडीत काढतील, जे तिरंगी ध्वजाचा, राष्ट्रगीताचा, राष्ट्र चिन्हाचा अवमान करतील, जे राष्ट्रीय अखंडता बाधित करतील, जे जातीय धर्मीय हिंसेला खतपाणी घालतील अशा सर्व व्यक्ती, संस्था, एनजीओ, संघटना, पक्ष ई. वर देशहितार्थ, देशरक्षणार्थ, देशाच्या समग्रतेसाठी सुरक्षिततेसाठी सुदर्शन चक्र फिरवा आणि या देशातून मनुवाद, ब्राह्मण्यवाद, संघवाद, जातीवाद, धर्मवाद, धर्मांधद्वेष ई. हद्दपार करून संविधानिक मूल्यांवर हा देश उभा करा. मानवतेवर हा देश उभा करा. विवेकावर हा देश उभा करा. विज्ञाननिष्ठ, प्रत्यक्षनिष्ठ, डोळस असा हा देश उभा करा. भारतीय संविधानिक मूल्यांचे गुणगान गा. या मूल्यांना गौरवा. स्वातंत्र्याच्या पवित्र दिनी तुम्ही स्वर्ग आणि नरकाची तुलना करू नका. स्वातंत्र्याच्या पवित्र दिनी अशुभला शुभच्या जोडीला बसवण्याचा प्रयत्न करू नका. असत्याला तुम्ही सत्याच्या जवळपास देखील फिरकू देता कामा नये. खोट्यावर खऱ्याचे झाकण लावून तुम्ही खोटे झाकून ठेवता कामा नये. याद राखा मानवीय संविधानाला अघोरी मनुस्मृतीच्या विषमतेने झाकण्याचा साधा प्रयत्न देखील करू नका आणि अशा अमानवीय, विषम मनुस्मृतीला मानणाऱ्या संघटनेचा, एनजीओ चा उदो उदो देखील संविधानिक देशात होता कामा नये. ■ ■



अॅड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

# चोरीचे सरकार आणि हतबल जनता

भारतात संविधान लागू होण्यापूर्वी प्रत्येक नागरिकांना मतदानाचा अधिकार नव्हता. मनुवादी व्यवस्थेत तो अधिकार केवळ काही निवडक उच्चवर्गीयांनाच होता. 1919 मध्ये भारतात आलेल्या साऊथ ब्यूरो कमीशन समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांच्या मतदानाच्या अधिकाराची मागणी केली. या मौलिक अधिकारासाठी डॉ. बाबासाहेबांनी आजन्म संघर्ष केला. शेवटी संविधानाच्या माध्यमातून 26 जानेवारी 1950 पासून प्रत्येक नागरिकांना मतदानाचा अधिकार त्यांनीच मिळवून दिला. या अधिकारामुळे वंचित, दलित, मागासवर्गीय व महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. हीच बाब मनुवाद्यांना अडचणीची ठरली. कारण मनुवादी व्यवस्थेत माणसा माणसात भेद आहे. गुलामीत राहणारे बरोबरीत कसे? असे प्रश्न त्यांना आजही भेडसावत आहेत. त्यासाठी मतदानात हेराफेरी, मत चोरी, मत बंदीसारखे उपाय शोधले जात आहे.

वयाच्या 70 वर्षात आम्ही अनेक प्रकारच्या चोऱ्या पाहिल्यात. पैशाची, सोन्याचांदीची, सिनेमातील दिल की चोरी ई. परंतु मागील वर्षी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूकीत चक्क आमदारांची चोरी पाहण्यात आली. तेव्हा जनतेच्या ज्ञानातही मतचोरीची भर पडली. महाराष्ट्र हरियाणाच्या विधानसभा निवडणूकीत केलेली मतचोरी राहुल गांधींनी पकडली. गांधींनी निवडणूक आयोगाला CCTV फुटेज, मतदान केंद्रावरील रेकार्डिंग, मतदारांची डिजिटल कॉपी मागितली. चोरीचा मामला म्हणून आयोगाने CCTV फुटेज नष्ट केले, त्याऐवजी त्यांना कागदांचा ढीग दिला. तरी सुद्धा राहुल गांधींनी मतचोरीचे अनेक पुरावे पत्रकार परिषदेत दिलेच. गांधी म्हणतात, बीजेपी आणि निवडणूक आयोग मिळून मत चोरीचा दरोडा घातला. गांधींच्या मते व्होटचोरी हा काँग्रेस किंवा भाजपचा मुद्दाच नाही. तो केवळ निवडणूक घोटाळाही नाही. तर तो संविधानाशी, 145 कोटी जनतेशी केलेला विश्वासघात होय. हा लोकाशाहीवर हल्ला होय. जनतेशी केलेली धोकाधडी होय. म्हणून तो खरा देशद्रोह आहे. सत्ताधाऱ्यांची बटीक असलेल्या निवडणूक आयोगाने घटनात्मक जबाबदारी पाळली नाही. त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या चरणी आपले सर्वस्व अर्पण केले. महाराष्ट्र-हरियाणा विधानसभा निवडणूकीत आयोगाने स्वतःची विश्वासार्हताच पणाला लावली. शेवटी चोरीचे बिंग फुटले. कारण 'सच्च निक्खुज्जति' अर्थात सत्य फार काळ कधी लपत नसते. शेवटी व्होट चोरीचा डंका जगभर पसरला. चोरी सुद्धा अशी की ज्यामुळे सामान्य नागरिकांचे भविष्य, रोजगार, शिक्षण सर्वकाही चोरीस गेले. जनतेचा सरकारवर असलेला विश्वास डगमगला. परंतु प्रधानमंत्र्यांना विश्वासाशी काही घेणेदेणे नाही. देशात कितीही अंधार असो, विश्वगुरुच्या विश्वभ्रमणावर परिणाम झाला नाही. त्यामुळे 'अंधेर नगरी चौपट राजा' या म्हणीची सार्थकता वास्तवात वाटू लागली.



श्रीराम बनसोड,
8208617748




निवडणूक आयोग ही स्वायत्त व संवैधानिक यंत्रणा आहे, याची जाणीव 1990 ते 1996 च्या दरम्यान टीएन शेषणच्या कार्यकाळात झाली होती. 'शेषन विरुद्ध नेशन' असे घोषवाक्य प्रचलित झाले होते. आज तंत्रज्ञानने प्रचंड क्रांती केली. निवडणूकीसाठी ईव्हीएम आले. त्यामुळे तांत्रिक मतचोरी सहज शक्य बनली. त्या विरोधात 'ईव्हीएम हटाव देश बचाव'चे देशभर आंदोलन झाले होते. पण 'ना सत्ताधारी झुकले ना निवडणूक आयोग भुकले'. निवडणूक आयोग कुणासाठी काम करत आहे, हे जनतेला कळून चुकले. यह जनता है सब जानती है. त्यामुळे 'व्होट चोर गद्दी छोड, गली गली में शोर है, मोदी सरकार चोर है' अशा घोषणा समाजमाध्यमांत उमटल्या. मत चोरी केल्याची निवडणूक आयोगालाही जाणीव असावी. त्यामुळे ते स्पष्टीकरण देण्याऐवजी राहुल गांधींनाच शपथपत्राची मागणी करू लागले, लेखी माफीनामा मागू लागले. दुसऱ्या अर्थाने आयोगाने राहुल गांधींना धमकावण्याचे काम केले. यालाच म्हणतात 'उलटा चोर कोतवाल को डांटे'. देशात शंभर टक्के भाजपची सत्ता असावी यासाठी सरकारने संविधानाची मोडतोड करण्याची कोणतीही संधी सोडली नाही. 2023 मधील विरोधी पक्षाच्या 141 खासदारांचे निलंबन, लाडकी बहीण योजना ते मतचोरी, हे सर्व प्रकार आचार संहितेच्या उल्लंघनाचे उदाहरण आहेत. चोरीच्या प्रकरणात सत्ताधारी आयोगाच्या पाठीशी आणि आयोग सत्ताधाऱ्यांच्या पाठीशी आहेत. म्हणजे चोर चोर मौसेरे भाई! यातून मार्ग कोणता काढावा म्हणून आयोगाने 'विशेष सखोल फेरतपासणी' (Special Intensive Revision—SIR) ची ढाल समोर केली. ज्याप्रमाणे ठराविकांचे फायदे लक्षात घेऊन नोटबंदी केली होती. आतंकवाद व भ्रष्टाचार हा केवळ देखावा होता. त्याच धर्तीवर बिहारमध्ये SIR रेटला जात आहे. त्यात पारदर्शकता, पुरावा व विश्वासार्हताचा अभाव आहे. बिहार विधानसभेच्या निवडणूका जवळ आहेत. विरोधकांचे, मागासवर्गीयांचे मतदान होऊ न देणे, हा मतबंदीचा हेतू आहे. 65 लाख मतदार मतदान सुचितून बाद केले म्हणे. जास्तीतजास्त भाजपाईंचा समावेश असलेली मतसूची असणार हे वेगळे सांगणे न लगे. भविष्यात बिहारचे हे मॉडेल पूर्ण देशात लागू झाले तर नवल वाटणार नाही.

बज गया डंका, लूट गई लंका, सारी दुनिया जाने,
वोट की चोरी, कर कर जिसे अंधभक्त ना माने. ■ ■




# डॉ. बाबासाहेबांची नीतीमुल्ये आणि दूरदृष्टी अभ्यासक आणि विश्लेषक

दीक्षाभूमीवर, सात लक्ष अनुयायांसह धम्मचक्र अनुवर्तनानं बुद्धधम्म प्रवेश, हा क्षण भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांने कोरला गेला. मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता, प्रबुद्ध भारत, प्रॉब्लेम ऑफ रुपी ग्रंथाने भारतीय रिझर्व्ह बँकेचा जन्म झाला.. पूर्वी शुद्र कोण होते, रिव्होल्यूशन ॲण्ड कॉऊंटर रिव्होल्यूशन, बुद्ध ॲण्ड हीज धम्म, असे 10 पूर्ण ग्रंथ, 10 निवेदने व साक्षीपुरावे, 10 शोधग्रंथ डॉ. बाबासाहेबानी देशाला दिले. भारताचे संविधान ही त्यांची अजरामर कृती जागतिक किर्तीचा ग्रंथ ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 50 हजार दुर्मीळ ग्रंथांची ग्रंथ संपदा होती. त्यांनी जागतिक स्तराच्या अनेक परिषदा गाजवल्या. त्यांच्या आयुष्याचा पूर्वार्ध माता रमाईने डॉ. बाबासाहेबात घडवला, तर त्यांचा उत्तरार्ध माईसाहेब सवीताने भारतरत्नाने सजवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुयायांना राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती शिकवली. शील, सदाचार, सहिष्णूता शिकवली. राष्ट्रीय संपत्तीच्या सुरक्षेचे घडे शिकवले. राष्ट्र आपले हे समजावून सांगितले. शील चारित्र्यानें अजोड असणाऱ्या डॉ. बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचा मार्ग ज्ञान-विज्ञान, परिवर्तन, वास्तववाद, तर्क -वितर्कातून प्रवाहीत झाला. राष्ट्र उद्धाराची त्यांची स्वतःची बेजोड कार्य पद्धती होती. अंधश्रद्धा, धर्मांधता त्यांच्या जवळ फटकलीही नाही. त्यांच्या शील संवर्धनाला तोड नव्हती. त्यांच्या जीवावर बेतणारे अनेक प्रसंग आले. ड्यूक धरून बसणारे मारेकरी कळ्ले. तरी त्यांनी कधी कोणाची पोलिसात तक्रार केली नाही की न्यायालयात फिर्याद नोंदविली नाही. त्यांच्या पावलागणिक विरोधक वाढले. डॉ. बाबासाहेबांनी विरोधासाठी विरोध केला नाही. विरोधकांची धर्मांधता, त्यांचा अजान डॉ. बाबासाहेबांना कळायचा. डॉ. बाबासाहेब शास्त्रशुद्ध व स्वतःच्या पद्धतीने आपले विचार पटवून द्यायचे.

सम्राट अशोकाच्या कारकीर्दीसारखा भारत देश जगाचा नायक ठरावा. या दूरदृष्टीने डॉ. बाबासाहेबांनी तथागत बुद्धांचा महामंत्र 'अत्त दिप भवं' देशाला दिला. देशात सतत गतिशील राहणारा धम्मचक्र, सत्यमेव जयते, बलशाली चार सिंहमुद्रा दिली. महाकारुणीक बुद्ध हेच युद्धाला पर्याय याची जगाला ओळख करून दिली. जगातील अनेक देशांना पटले. पण स्वार्थी मुर्दाड भटांना पटेनासे झाले. यावर तोड म्हणून काही स्वार्थांध भटांनी देशात अज्ञान, अंधश्रद्धा, धर्मांधता पसरविण्यासाठी खलबते सुरु केले. जसे कुत्र्याची शेपटी. त्यांचे परिणाम याच जन्मी त्यांना भोगावे लागतील. हा त्यांना इशारा. युग जान, विज्ञान, तंत्रज्ञानाचे, संगणकाच, प्रात्यक्षिकाचे, वास्तविकतेचे, प्रमाणाचे आहे. कल्पना विलासात रमलेल्या भटांनी देवादिकांची निर्मिती करून स्वार्थासाठी त्यांचा आड घेतला. देवांच्या नावावर काल्पनिक कथा निर्माण करून देशात गोंधळ घातला. देशाचे वाटोळे केले. संविधान पुरस्कृत समता, समानतेला समांतर जाती भिन्नता, जाती द्वेष कायम ठेवणाऱ्या समरसतेला पुढे केले. जनतेने यातले मतलबी धोरण समजावे. धम्मचक्र अनुवर्तनाने देशात बुद्ध तत्वज्ञान, समता, समानता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, याची पुनर्पेरणी झाली. शेताची निगा राखणारे संरक्षक सतर्क आहेत. लुच्चे स्वार्थासाठी भरकटले. जातील कुठे? सर्वांसाठी डॉ. बाबासाहेबांनी स्वयंप्रकाशित होण्याचा महाकारुणीकाचे कल्याणकारी सार्वभौम मार्ग दाखवला. उपाय सूचवला, 'बुद्धं सरणं गच्छामी!' ■ ■

विद्या व्यासंग



प्राचार्य भाऊ वासनिक
मो. 9423606064




# जुगाड

हा एक हिंदी शब्द. आजमीतीला हा शब्द जुगाड म्हणजे व्यवस्था, बंदोबस्त, बांधकाम क्षेत्रात प्लॅस्टर करतांना लाकूड, बल्ल्यांचा, बासांचा मनोरा उभा करणे म्हणजे जुगाड बांधणे. बांधकाम क्षेत्रात प्रत्येकाची कामे ठरलेली असतात. लोहा बांधणारा लोखंडाचे जुगाड बांधेल, प्लॅस्टर करणारा मिस्त्री फक्त प्लॅस्टर करेल, तर जुगाड बांधणारे नुसते जुगाड बांधून मोकळे होतात.

**जुगाड :-** कौशल्य आणि कल्पना शक्तीचा वापर करून एखाद्या समस्येवर सोपा उपाय शोधणे किंवा स्वस्त, मूलभूत वस्तू वापरून काहीतरी दुरूस्त करणे किंवा बनवणे हा त्याचा खरा अर्थ. पण काही टपोरी विद्यार्थी किंवा ज्याचा अभ्यास झालेला नसेल असे काही अति हुशार विद्यार्थी, पेपर कुठून लिक करता येईल इथपासून तर तो पेपर तपासण्यासाठी कुणाकडे गेला असेल इथपर्यंत जुगाड लावत असतात आणि येनकेन प्रकारे ते आपले साध्य प्राप्त करत असतात. नोकरी संदर्भात तर जुगाड अत्यंत लोकप्रिय. पैसे देणारे, पैसे घेणारे दलाल, चुकीचे प्रमाणपत्र मिळविणारे, खोटे खोटे नियुक्तीचे पत्र मिळवून गिऱ्हाईक पकडणारे असे घाणेरडे प्रकार करणारे लोक नेहमी असे जुगाड करण्यात मशगुल असतात. जुगाड बनवत असतात, सावज हेरत असतात, फसणारे फसतात, प्रकरण अंगावर येत असल्यास पोबारा करणारेही अनेक आहेत. तो त्यांचा व्यवसायच होवून जातो. भिस्या, चीटफंड योजना, छोट्या-मोठ्या गोष्टींचे प्रलोभन दाखवून जुगाड करणारे एजंट यांची एक सांघिक टोळी असते.

नुकतेच एका लुटेरी दुल्हनचे प्रकरण उघडकीस आले आहे. ती अशा जुगाडामुळे आठ, नऊ लोकांना करोडोनी चुना लावत आपली एक टोळींच बनवली आहे. नुकतीच तिला नाट्यमयरित्या अटक होवून जेलची हवा खाण्याकरिता रवाना करण्यात आले आहे. इकडच्या भोळ्या-भाबड्या पोरी पटवून राजस्थानात विक्री करणारे काही कमी नाहीत. पद्धतशीर पणे जुगाड लावून ते पोरी, बाया पटवत असतात. लोकही ''काही'' पैशाखातर बळी पडतात.

आपल्या इकडे होळीचा पाडवा आणि पोळ्याचा पाडवा हे दोन सण मद्यपी लोकांचे आवडते सण. यांचे जुगाड नकली दारू बनवण्यापासून तर ते या राज्यातून दुसऱ्या राज्यात पाठवणारे महाभाग तसेच हवसे, गवसे, नवसे दारूचा कसा जुगाड लावता येईल या विवंचनेत असतात. तेव्हा ते एकमेकाला मोठ्या प्रेमाने विचारत असतात - पोला आया रे बाबा, कुछ जुगाड है क्या?

या जुगाडाचे लोण राजकारणात न पसरले तर नवलच होईल. कोणते सरकार कसे पडेल, त्यांचे कार्यकर्ते कसे फोडता येतील, कोणाला विकत घेता येईल, कोण विकत घेण्यासारखा आहे. त्याला साम, दाम, दंड या नितीने कसे आपल्याकडे ओढता येईल, नाहीच ऐकला तर इडी नावाचे महाभयंकर जुगाड तयार आहेच. या जुगाडामुळे चांगले चांगले हादरले, रडकुंडीस आले. अन जुगाड करणाऱ्यांच्या कंपूत आपोआप शामील झालेत. जुगाड लावणारे दुरून तमाशा पाहतात. त्यांना माहीत आहे. हे असे जुगाड लावल्याशिवास आपण राजकारण करू शकत नाही. असे ही 'जुगाडू राजकारण' आजकाल खूप फोफावले आहे. जो सगळ्यात जास्त जुगाड लावेल तो सगळ्यात यशस्वी, शातीर, बेरकी, दगाबाज, राजकारणी कोण हे सुज्ञास न सांगितलेले बरे. ■ ■



दिवाकर शिर्के
मो. 9923862843




## बहुजन हिताय बहुजन सुखाय बुद्ध विहार

**कावळा पेठ. ( शांतीनगरचे बाजूला ) नागपूर**

विहाराच्या भागात प्रियदर्शी सम्राट अशोक अभ्यासिका ( लिबर्टी क्लॉसेस ) आहे. ही अभ्यासिका विद्यार्थ्यांकरीता रात्र दिवस सुरू असते. विहारात रोज सायंकाळी सकाळी वंदना होते. विहारात वर्षावास मध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथाचे वाचन होते. सर्व महापुरुषांच्या जयंती आणि स्मृती दिवस साजरे केल्या जातात. विहारात नेहमी खेळीमेळीचे वातावरण असते. येथिल कार्यकर्ता सक्रीय आहेत.

संवाद मित्र,कृष्णा चिंतामण बोरकर
मो नं. 7620358959

# धम्म प्रचारकानी जिथे धम्म प्रचार नसेल तेथे जाणे आवश्यक : अशोक सरस्वती

**आशिफाबाद :** महाराष्ट्राच्या शेजारी असलेल्या तेलंगणा राज्यात धम्म प्रचाराचा प्रचंड अभाव आहे. धम्म दिक्षेच्या 69 वर्षानंतर देखील आशीफाबाद जिल्ह्यात जर धम्म प्रचार नसेल तर प्रचारकांसाठी ही लाजिरवाणी बाब आहे.

म्हणून जिथे प्रचार आहे तेथे गर्दी न करता जिथे गरज आहे. तेथे प्रचारकांनी जाऊन धम्म प्रचार केला पाहिजे असे आवाहन करून माझे प्रवचन हा त्याचा एक भाग असल्याचे बुद्ध विहार समन्वय समितीचे अध्यक्ष आणि आंबेडकरी कीर्तनकार अशोक सरस्वती बौद्ध यांनी आपल्या पाच दिवसीय धम्म प्रवचन मालेचा समारोप करताना आपल्या धम्म प्रवचनातून प्रतिपादन केले.

ते तेलंगणा राज्याच्या आशिफाबाद येथील लुंबिनी दीक्षाभूमी बुद्ध विहारात झालेल्या धम्म प्रवचनातून धम्मोपदेश करतांना बोलत होते.

या पाच दिवसात बुद्ध विहारात रोज सायं. 7 ते 9 प्रवचनमाला आयोजित करण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती, चार आर्य सत्य, आर्य अष्टांगिक मार्ग या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. समारोपाच्या दिवशी सायं. 6 वा. बोधीवृक्ष विधिवत 65 गावाच्या जात पंचायतीचे उपाध्यक्ष क्रिष्णाजी झोडे आणि सचिव सेवा निवृत्त पोलिस सब इन्स्पेक्टर तुकारामजी दुर्गे यांचे प्रमुख उपस्थितीत लावण्यात आला.



या पाच दिवसाच्या प्रवचन मालेला यशस्वी करण्यासाठी तुकाराम दुर्गे, संजयराव नगराळे, यशवंतराव दुर्गे, साधना नगराळे, रेणुका दुर्गे, से. नि. आर.एफ.ओ. कृष्णाजी झाडे, सुधाकर दुर्गे, यांनी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. समारोप प्रसंगी प्रवचनकार यांचा पुरुष उपासक आणि महिला उपासिका यांनी स्वतंत्रपणे शाल पांघरून आणि पुष्प गुच्छ देऊन सन्मान केला.

या नंतर दोन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्याचा सर्वांनी संकल्प केला.

या दरम्यान वांकडी येथील बुद्ध विहारात सोमवार दि. 11 ऑगस्ट रोजी बुद्ध विहार समन्वय या विषयावर मार्गदर्शन व चर्चा संपन्न झाली. विहाराचे सचिव विजय उपरे हे बैठकीचे अध्यक्ष होते.

तीन दिवसाचे पावसामुळे बराच व्यत्यय आला तरी त्यावर मात करण्यात आली. साधना आणि सतीश नगराळे हे उभयता नियमित पाचही दिवस उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

## राष्ट्रसंत साहित्यावर जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा 21 ऑगस्टला

**चंद्रपूर :** श्रीगुरुदेव सेवाश्रम नागपूर अंतर्गत राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळद्वारा आयोजित आणि राष्ट्रसंत विचार साहित्य परिषदेच्या सहकार्याने येत्या 21 ऑगस्ट 2024 रोजी चंद्रपूर जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा निःशुल्क आहे. इयत्ता 7 ते 12 च्या विद्यार्थ्यांसाठी निबंधाचे पुढील विषय दिलेले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील ग्रामनाथ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील सणोत्सव यापैकी एका विषयांवर संबंधित विद्यार्थ्यांनी पंधराशे शब्दांचा निबंध प्रत्यक्ष केंद्रावर येऊन लिहायचा आहे. सदर निबंध स्पर्धा बल्लारपूर, राजुरा, चंद्रपूर, सिंदेवाही, मुल, सावली, भद्रावती येथे निश्चित केलेल्या केंद्रावर होणार आहे. सहभागी सर्व स्पर्धकांना आकर्षक प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. बाळ पदवाड, विठ्ठलराव पुनसे यांनी केले आहे. आयोजन संदर्भात जिल्हास्तरीय समन्वय समितीमध्ये प्रा. नामदेव मोरे घुग्घुस, ॲड. राजेंद्र जेनेकर राजुरा, राजेंद्र हजारे, विलास चौधरी सिंदेवाही, डॉ. श्रावण बानासुरे बल्लारपूर, डॉ. धर्मा गावंडे सावली, नामदेव पिज्दूरकर मुल, अभय घटे, बंडू टेकाम, कार्तिक चरडे, प्रा. संगिता मालेकर, देवराव कोंडेकर, रोहिणी मंगरूळकर, रिया पिपरीकर आदींचा समावेश करण्यात आला आहे.

### महत्वाचे

## प्रयाण, आदित्य आणि कार्तिक विजेते ठरले DSO तालुकास्तरीय कराटे स्पर्धा



**नागपूर :** जिल्हा क्रीडा कार्यालयाअंतर्गत, नागपूर ग्रामीण तालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धा शुक्रवारी वाडी नगरपरिषदेतील रामकृष्ण सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती. उद्घाटन अतिथी जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. पल्लवी धात्रक, वाडी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. रिचा धाबर्डे, वाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश तटकरे यांच्या हस्ते झाले. मुख्य आयोजक मनीष येवले स्पर्धेत 14, 17, 19 वर्षांखालील 50 शाळांमधील 260 हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यापैकी 06 कराटे खेळाडू भोंसला मिलिट्री स्कूलचे होते. 14 वर्षांखालील मुलांच्या गटात, प्रयाण सिद्धार्थ सोनारकर (34 किलो वजनी गटात), आदित्य श्रीवास्त (54 किलो वजनी गटात) 17 वर्षांखालील मुलांच्या गटात, कार्तिक वैभव टिचकुले (62 किलो वजनी गटात) 19 वर्षांखालील मुलांच्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. आणि 14 वर्षांखालील मुलांच्या गटात, लक्ष्य कासारे यांनी दुसरे स्थान पटकावले. कराटे संघटनेचे मुख्य अधिकारी रेंशी सुरेंद्र उगले, सेंसेई कृष्णा भलावी, भोंसला मिलिट्री शाळेचे क्रीडा शिक्षक शुभम बाळा उपस्थित होते.

## डॉ. श्रीकांत रणखांबे सुवर्णलक्ष राष्ट्रीय क्रीडा पुरस्काराने सन्मानित

**सांगली :** मेजर ध्यानचंद केंद्रीय क्रीडा परिषद, भारत आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिन नुकताच राजारामबापू नाट्यगृह, इस्लामपूर, जिल्हा सांगली येथे माजी आमदार भगवानराव साळुंखे, महाराष्ट्र केसरी (1978) आप्पासाहेब कदम, ऑलम्पिकवीर बंडा पाटील रेटरेकर, पोलिस अधिकारी गणेश कोंडते या प्रमुखांच्या उपस्थित संपन्न झाला. यावेळी मांजर्डे, गावचे सुपुत्र, थोर समाज सेवक, कुस्तीचे आधारस्तंभ डॉ. श्रीकांत सीताराम रणखांबे यांना त्यांच्या कुस्ती खेळातील भरीव योगदानाबद्दल महाराष्ट्र केसरी आप्पासाहेब कदम यांच्या हस्ते सुवर्णलक्ष राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार 2025 देऊन गौरवण्यात आले. क्रीडा क्षेत्राला एक नवी दिशा देणारे, राष्ट्रीय कुस्ती संघटक डॉ. श्रीकांत सीताराम रणखांबे, यांचे कुस्ती या खेळात योगदान अतुलनीय आहे. देश भरातून नामवंत मल्लांना गावच्या कुस्ती आखाड्यात सातत्याने ते आणत आहेत.

# कामगार नेते नरेश अडचुले यांचा सेवानिवृत्तीपर सत्कार सोहळा

## समाजहितासाठी संघर्ष करणे हेच संघटनेचे ध्येय : रमेश पाटणे

**नागपूर :** एकता, संघर्ष, त्याग व बलिदान हिच कुठल्याही संघटनेची आदर्श चतुःसुत्री आहे. एकतेच्या बळावर संघटनेचे कार्य कामगारहित व उद्योगहित जपण्यासोबत समाज हितासाठी संघर्ष करणे हेच कामगार संघटनेचे कार्य ज्येष्ठ कामगार नेते रमेश पाटणे यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र शासन गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त कामगार एलआयसीतून सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने मोहन नगर स्थित सहकार जीवन सभागृहात संघटनेद्वारा आयोजित सेवानिवृत्तीपर सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी संघटनेचे ज्येष्ठ नेते अनिल ढोकपांडे, रमेश पाटणे, वाय. आर. राव, शिवा निमजे, पी. व्ही. मिलिंदकुमार यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन नरेश अडचुले व तनवी अडचुले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विकास अधिकारी राजेंद्र जैन, राजेश सतिजा, सुनिल डोंगरे, श्रीकांत पवनीकर, राजकुमार फुलबांधे यांची शुभेच्छापर भाषणे झाली.

लोकशाही, धर्मनिरपेक्षता व समाजवाद या संवैधानिक मूल्यांना आदर्श मानून विमा कामगारांच्या न्याय्य




हक्कासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे नरेश अडचुले यांच्या प्रामाणिक कार्याचा, भावपूर्ण संघटन सेवेचा हा गौरव आहे, असे गौरवोद्गार कामगार नेत्यांनी आपआपल्या भाषणातून काढून त्यांच्या संघटन कार्याची खूप प्रशंसा केली व सेवानिवृत्तीबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी अध्यक्षपदी संघटनेचे अध्यक्ष शिवा निमजे उपस्थित होते. आपल्या सत्काराला उत्तर देताना नरेश अडचुले यांनी ज्येष्ठ कामगार नेते व सभासदांनी दिलेले मोलाचे सहकार्य, मार्गदर्शन व भक्कम पाठिंब्याबाबत कृतज्ञता व्यक्त केली. या निरोप समारंभाला विमा कर्मचारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते. संचालन संघटनेचे महासचिव वाय. आर. राव यांनी तर उपस्थितांचे आभार हिना जिभकाटे यांनी मानले.

# 15 ऑगस्ट आणि पोलिसांची सतर्कता? महाराज बागेत 2 तास खुली डुकरे

**नागपूर :** 15 ऑगस्ट रोजी दुपारी 12 वाजताच्या दरम्यान मी माझ्या मुलीला घेऊन महाराजबाग येथील प्राणी संग्रहालयाला भेट दिली. मच्छालयाला भेट देऊन पशुपक्षांकडे जात असताना रस्त्याशेजारी एक पांढऱ्या रंगाचा गावरान डुक्कर व त्याची तीन पिल्ले दिसली. त्याची माहिती स्थानिक गार्ड, महिला पोलीस व पोलीस कंट्रोलला दुपारी 12.30 च्या दरम्यान दिली. त्याचे फोटो व व्हिडिओ सुद्धा पाठविले. परंतु दुपारी 2 वाजेपर्यंत त्या डुकरांचा शोध घेण्यात पोलीस व स्थानिक महाराजबाग प्रशासन नाकामी ठरले. आपले प्रशासन किती नाकर्ते आहे याचा प्रत्यय आला. हे डुक्कर पाहताच माझी मुलगी घाबरली, अनेक मुलेही घाबरली, मी त्याचे फोटो काढून तिथल्या एका गार्डला हा डुक्कर येथे फिरणाऱ्या मुलांना वगैरे नुकसान पोहोचू शकतो असे सांगितले. त्यावर हे माझे काम नाही, मी पॉईंट सोडत नाही, तुम्ही कार्यालयात तक्रार करा, असे सांगितले. येथे चार महिला शिपायांचा ग्रूप येताना दिसला. त्यांना थांबा मला तक्रार करायची आहे, असे म्हणताच त्यातील फक्त एक शिपाई थांबली, त्यांना हा प्रकार सांगितल्यावर त्यांनीही महाराज बागेच्या कार्यालयात जाऊन तक्रार करण्याचा सल्ला दिला. नंतर मी पोलीस कंट्रोल रूमला फोन केल्यावर माझीच सविस्तर इन्क्वारी करत बसले आणि डुकराचा तुम्हाला काय त्रास आहे? ते कुणाला चावत आहेत का? हे सुद्धा विचारले, मी स्थानिक नागपुरातील पोलीस कंट्रोलला फोन केल्यावर त्यांनी तिथे असलेल्या शिपायाला सांगण्याचे सुचविले, त्यानंतर त्यांनी संबंधितांना कळवतो असे बोलले, नंतर बर्डी पोलिसांचा फोन आला, तुम्ही कुठे आहात, डुक्कर कुठे आहेत? त्याचे फोटो व्हिडिओ, पाठवा अशी सूचना केली.



पुन्हा त्यांना मी दीड तासानंतर म्हणजेच 2 वाजता त्या डुकराचे जिवंत व्हिडिओ व फोटो पाठविले. त्यानंतर पोलीस आणि महाराजबाग प्रशासनाचे गार्ड शोध मोहिमेवर निघाले. म्हणजे दीड तास पर्यंत हजारो लोक असलेल्या महाराज बागेत दीड तासपर्यंत डुकरांचा व त्यांच्या पिल्लाचा सर्रास वावर असतो. तोपर्यंत त्याचा प्रतिबंध केल्या जात नाही. किंवा त्यांचा प्रतिबंध करणारी यंत्रणा महाराज बागेकडे उपलब्ध नाही, जर ती डुकरे पिसाळलेली असती किंवा जर त्यांनी आपल्या पील्ल्याच्या संरक्षणात हल्ले केले असते तर कित्येक मुले जखमी झाली असती. जर एखाद्या वेळेस वाघ सुटला तर त्याचा बंदोबस्त करणारी यंत्रणा महाराज बागेकडे आहे काय? असा प्रश्न बसपा नेते उत्तम शेवडे यांनी प्रशासनाला विचारला आहे.

## निधन वार्ता

### सुशांत सेवकराम सरदारे



**नागपूर :** लघुवेतन कॉलनी येथील रहिवासी सुशांत सेवकराम सरदारे यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्यु समयी त्यांचे वय 56 होते. त्यांच्या पार्थिवावर वैशाली निर्वाणघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.




# विविध संस्था संघटनांकडून स्वातंत्र्य दिन साजरा!

## नगरपंचायत बहादूरा




**बहादुरा :** नगरपंचायत बहादूरा अंतर्गत (दि.13) ला सकाळी 9 वाजता 'हर घर तिरंगा हर घर स्वच्छता' अभियान यात्रेचे आयोजन करण्यात आले. पण सकाळीच पावसाने आपला तकाजा लावला. सकाळचे 9 वाजले, प्रतिनिधीने प्रशासक सागर ठाकरे यांना कॉल केला व विचारले की रॅलीचे काय, जागेवर एकही व्यक्ती नाही. ते बोलले, 'सर रॅली नक्की होईल' व काही वेळातच पाहता पाहता तिरंगी ध्वज लहरतांना दिसले व गर्दी वाढली पावसावर मात करीत सर्व देश प्रेमी संजूबा शाळा, शिर्डी नगर गोंहिसिम परिसरात जमले व वातावरण निर्माण झाले ते पावसाचे नाही तर देश प्रेमाचे. नगरपंचायत बहादुराचे मुख्याधिकारी राजेंद्र चिखलखुंदे यांनी 'हर घर तिरंगा हर घर स्वच्छता' अभियान यात्रेला तिरंगा दाखवीत सुरुवात केली व सर्व जनता देशभक्तीच्या गीतावर अशी मग्न झाली की सर्वांना पावसाचाही विसर पडला. गोन्ही सिम परिसरातून रॅली बहादुरा फाटा सद्गुरु लॉन मार्गाने खरबी चौककडे जात असतांनाच या रॅलीत सहभागी झाले ते माजी आमदार टेकचंद सावरकर. रॅली गरीब नवाज चौकमधे पोहचली व तिथे विवेकानंद शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्तम कवायतीचे सादरीकरण करत देशभक्ती जपली. सदर अभियान रॅलीचे समारोप खरबी परिसरातील लॉनमध्ये करण्यात आले. आयोजित 'हर घर तिरंगा हर घर स्वच्छता' अभियान रॅलीमध्ये नगरपंचायत बहादुराचे सर्व अधिकारी, कर्मचारी, सामाज सेवक, राजकीय पाट्यांचे प्रतिनिधी, सेवानिवृत्त सैनिक, पत्रकार, शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून देशभक्ती गीतावर नृत्य सादर करीत या अभियान यात्रेतून स्वच्छता, हर घर तिरंगा व वृक्षरूप करण्याचा बोध घेतला.

## स्कॉलर कान्वेन्ट, फुसे हायस्कूल, बोरगाव




**नागपूर :** स्कॉलर कान्वेन्ट, फुसे हायस्कूल बोरगाव, काटोल रोड नागपूर येथे 79 वा स्वातंत्र्य महोत्सव साजरा करण्यात आला. प्रसंगी सामाजिक कार्य करते व शाला संस्थापक भिमराव फुसे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी वस्तीतील वरीष्ठ नागरिक मोठ्या संखेत उपस्थित होते. घनश्याम मागे, अरविंद बोरघाटे, प्रमोद ठाकूर, पांडुरंग सिंगने, गिरीश ग्वाळवंशि, विजयकुमार गोलात, दीनदयाळ फुसे, रविंद्र फुसे, तुकाराम चौधरी, भाऊराव कापसे, वैशाली चोपडे, शाळेतील मुलांनी देशभक्तीपर गीते सादरीकरण केले. शाळेतील शिक्षिकेने कार्यक्रम आयोजित करण्यास मुख्याध्यापक सलमा शेख, शैला बाविस्कर, दिक्षा आदमने यांनी अथक परिश्रम घेतलेत संचालन सना शेख व आभार पलवी चरपे यांनी केले.

## चंद्रमणी गार्डन



**नागपूर :** स्वातंत्र्य दिनानिमित्त चंद्रमणी नगर गार्डन येथे योग्य नृत्य परिवारातील सदस्यांनी विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करून स्वातंत्र्य दिवस जल्लोषात साजरा केला. वेशभूषा व प्रश्नमंजुषा देखील आयोजित करण्यात आली. महिला व पुरुषांना देशभक्तीपर गीते सादर केली. तसेच अस्मिता बोरकर यांच्या कल्पनेतून अश्विनी ढोके यांनी भारत मातेची सुंदर वेशभूषा करून भारत माता सादर केली. कार्यक्रमाला उपस्थित नितीनचंद्र राजकुमार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजनी पोलीस थाने नागपूर, यांनी ऑपरेशन थंडर 2025 अंमली पदार्थ विरोधी जनजागृती सप्ताह अंतर्गत कायद्यांची माहिती दिली. आजच्या युवा पिढीला व्यसनापासून मुक्त करण्याकरिता कुटुंब व समाजाने कसे जागरुक असावे याविषयी मार्गदर्शन केले. संविधानात मानवाचे अधिकार आहेत. पण सोबतच काही कर्तव्य देखील आहेत. त्याचे पालन करणे जिवनाकरिता व पर्यावरणाकरिता कसे हितावह आहे याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचीन देशभ्रतार, सौरभ गजघाटे, विजया कांबळे, शुभांगी झोडापे, वंदना कुंभलवार, कमल कांबळे, अस्मिता बोरकर सर्व महिलांनी व सर्व पुरुष मंडळींनी योगदान दिले.

## भारतीय बौद्ध महासभा, नगर शाखा, उत्तर नागपूर



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत भारतीय बौद्ध महासभा नगर शाखेच्या वतीने 15 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 11 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्ट हरदास नगर कांडप मशीन जवळ, लष्करीबाग, उत्तर नागपूर येथे भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक तसेच वंचित बहुजन आघाडी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पंचशील झेंड्याखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला समता सैनिक दलाच्या वतीने सलामी मानवंदना देण्यात आली, ध्वजारोहण डॉ. बाबासाहेब आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्ट ट्रस्टी सचिव भगवान कांबळे, यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले, या शुभ प्रसंगी भारतीय बौद्ध महासभा नगर शाखा उत्तर नागपूर, अध्यक्षा पंचशीला सहारे, तसेच वंचित बहुजन आघाडी उत्तर नागपूर विभागीय अध्यक्षा वर्षा धारगावे, या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रामुख्याने उपस्थित होते, स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रमुख उपस्थिती रेखा वानखेडे, रमा सोमकुवर, गीता जांभूळकर, सरोज खोब्रागडे, साधना सोमकुवर, माया देशभ्रतार, वनमाला कांबळे, संध्या पाटील, निरंजना बोरकर, पुष्पा बोरकर, मीना गजभिये, झिबर्ला तांभोरे, विशाखा लोखंडे, सुनिता लाऊतरे, रमा टेंभुर्णे, दीपा कांबळे, हर्षीका सहारे, अंजली श्रीवास, तेजेश्वीनी ठाकूर, नलीनी गजभिये, इत्यादी मोठ्या प्रमाणात 15 ऑगस्ट 2025 ला स्वातंत्र्य दिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभा पदाधिकारी व समता सैनिक दल सैनिक तसेच वंचित बहुजन आघाडी उत्तर नागपूर कार्यकर्ते कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन वर्षा धारगावे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गीता जांभूळकर कोषाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा नगर शाखा उत्तर नागपूर यांनी केले.

## मंगलदिपनगर




**नागपूर :** श्री गुरुदेव सेवा मंडळ मंगलदिप नगर मानेवाडा बेसा रोड नागपूर येथे 79 वा स्वातंत्र्य दिन मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न. कार्यक्रमाची सुरुवात अधिष्ठान स्थापना, राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला माल्यार्पण. ध्वजारोहण दिपक बन्सोड, सेवानिवृत्त प्राध्यापक सेवासदन नागपूर मारोतराव महेशकर संचालक(कुटुंब सुपर मार्केट) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख पाहुणे मधुकरराव नागपुरकर, प्रविण वाटाने सामाजिक कार्यकर्ता, लेखनदास नारनवरे, अनिल चन्ने वरीष्ठ नागरीक यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण राष्ट्रगीत, मानवंदनाने कार्यक्रमाला सुरुवात. स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर कार्यक्रमाचे मुख्य वक्ता बनसोड यांनी स्वातंत्र्यासाठी ज्या ज्या शुरवीरांनी, शहिदांनी, आपल्या प्राणांची पर्वा न करता देशासाठी बलीदान दिले, हुतात्म पत्करले. म्हणूनच आपण सर्व भारतीय सुरक्षितपणे स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. वंदनीय तुकडोजी महाराजांचे स्वातंत्र्याच्या क्रांतीलढ्यात मोठे योगदान आहे. अध्यक्षीय भाषणात महेशकर यांनी मातापिता कसे असावे आदर्श असे माता-पिता जन्म देतील आदर्श सुता मातेने व पित्याने आपल्या सुपुत्रांनां घडवुन देशसेवेसाठी जनसेवेसाठी कृतसंकल्प करावा. प्रविण वाटाने यांनी श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचा उत्सव मागील चार वर्षापासून सुरू आहे. मंगलदिप नगरचे सेवकवृंद शाखा अविरत कार्यशील सेवाभावी वृत्तीने कार्य उपस्थित सेवकवृंदांना शुभेच्छा दिल्या. निसर्गाच्या प्रकोपामुळे ढगफुटीत झालेल्या विनाशात हिमाचल प्रदेश येथील किस्तवाड, किनौर, उत्तराखंड येथील धरालीत विनाशात बळी पडलेल्या मृत आत्म्यास मौन श्रद्धांजली वाहण्यात आली. राष्ट्रवंदनाने कार्यक्रमाचा समारोप झाला. संचालन, आभार निशांत चंद्रभान राऊत (सचिव) गुरुदेव सेवा मंडळ यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रभान राऊत सेवाधिकारी श्री गुरुदेव सेवा मंडळ मंगलदिप नगर, देवेंद्र किनकर उपसेवाधिकारी, कांता राऊत अध्यक्ष गुरुकुंज निधी लिमिटेड कंपनी, एकनाथ घोडे, वैभव राऊत, प्रकाश उपासनी, चंद्रशेखर कडवे, निरंजन राऊत, मधुकर मुंगभाते, अविनाश नेव्हारे, प्रशांत नेव्हारे, प्रतिक्षा निशांत राऊत, चंद्रकला नेव्हारे, दर्शन नेव्हारे यांनी अथक परिश्रम करून मोलाची कामगिरी केली...

## मॉ जिजाऊ वाचनालय खडकी



**अकोला :** मॉ जिजाऊ सार्वजनिक वाचनालय न्यु महसुल कॉलनी, खडकी बु. अकोला येथे 15 ऑगस्ट 78 वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिजाऊ वाचनालयाचे अध्यक्ष पंजाबराव वर यांनी स्वातंत्र्यदिन महोत्सवाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक एकनाथजी शिरसाट होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये से.नि.तहसीलदार आत्माराम तेलगोटे, से.नि. मंडळ अधिकारी ज्ञानदेव खंडारे, भारतजी ठोंबरे, वासुदेवराव काकडे, जिल्हाधिकारी कार्यालयातील से.नि.कर्मचारी रत्नाकर भुजाडे, समाजसेवी सुभाष वानखडे, रमेश बदरखे, युवा कार्यकर्ता मंगेश झिने, दिनेश सोनोने, सुरेखा सोनोने, मनिषा भुजाडे, मिनाक्षी शेगोकार, जयश्री झिने, विद्या अंभोरे, सार्थक, अजिंक्य, आदित्य, रोशन, अनूजा समृद्धी, ईश्वरी, मंजिरी आदींची उपस्थिती होती. स्वातंत्र्य हे आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या धाडसाचे आणि बलिदानाचे अभिमानाने स्मरण करतो ज्यांनी आपल्याला स्वतंत्र देशात राहता यावे म्हणून संघर्ष केला. आपला राष्ट्रध्वज आणि गान आपल्याला आपल्या राष्ट्राच्या सन्मानाचे रक्षण करणे किती महत्त्वाचे आहे याची आठवण करून देतो. 15 ऑगस्ट हा दिवस भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूरविरांचा आदर करणारा आहे. भारताचे स्वातंर्त्य म्हणजे ब्रिटीशांच्या गुलामुगिरीतून मुक्त होऊन भारताला स्वतःचे निर्णय घेण्याचा, स्वतःच्या कायद्याचे पालन करण्याचा, देशाचे प्रशासन चालविण्याचा संपूर्ण अधिकार म्हणजेच स्वातंत्र्य होय. असा विचार मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन पंजाबराव वर यांनी तर आभार प्रदर्शन मंगेश झिने यांनी मानले. मिठाई वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जि.प. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा, पचखेडी




**कुही :** जि. प. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा पचखेडी येथे 79 वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रभात फेरी, ध्वजरोहन व कवायत सादरीकरण नंतर स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने शाळेत भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग या विषयावर 'भारतीय अग्निशिखा' या शिर्षकांतर्गत पोस्टर प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. यात 1857 च्या उठावात सहभागी महिला, 1942 च्या चले जाव चळवळीत सहभागी महिला, स्वातंत्र्य लढ्यात सहभागी बहुजन, दलित, आदिवासी स्त्रियांचे योगदान, मुस्लिम स्त्रियांचे योगदान, महात्मा गांधी यांच्या प्रभावाने लढ्यात सहभागी महिला, विदेशी महिलांचे योगदान, अश्या सर्व महिलांची माहिती या प्रदर्शनात पोस्टर स्वरूपात लावली होती. या प्रदर्शनीचे उद्घाटन गावचे सरपंच विवेक मेश्राम यांच्या हस्ते व उपसरपंच दिलीप भोयर, ज्ञानेश्वर शेंडे अध्यक्ष शा. व्य. समिती, मंगला भोयर, पौर्णिमा निकुळे, सदस्य शा. व्य समिती, गुणवंता लांजेवर, तंटा मुक्ती अध्यक्ष, केंद्रप्रमुख मनोज बोरकर, संतकबीर मुळे, प्रदीप शेंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रदर्शनीचे सर्वांनी कौतुक केले व महत्वाचे ऐतिहासिक दस्तावेज म्हणून महत्वाचे आहे असे मत सर्व मान्यवर व गावकरी मंडळींनी व्यक्त केले. या प्रदर्शनीतील माहितीचे, चित्राचे संकलन शाळेतील सहाय्यक शिक्षिका अर्चना खैरे व माधुरी सेलोकर यांनी केले होते. मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक जी. दहिलकर, तसेच सहकार्य शाळेतील शिक्षक किशोर साखरकर, अविका गभणे, प्रिया लुले, गणेश मुंढे यांनी केले होते. ही प्रदर्शनी 18 व 19 ऑगस्टला पुन्हा दोन दिवस परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शाळेत सुरु ठेवण्यात येईल असे मुख्याध्यापक दहिलकर यांनी सांगितले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648